



सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक १९६ • शनिवार दि.२ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


## बारावी निकालात मुली दमदार;कोकण अव्वल,लातूर घसरले

### कॉपीमुक्तीमुळे निकाल घसरला



मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यंदाही मुलींनी उत्तुंग कामगिरी करत बाजी मारली आहे. राज्याचा एकूण निकाल ८९.७९ टक्के लागला असून तो गेल्या वर्षाच्या ९१.८८ टक्क्यांच्या तुलनेत २.०९ टक्क्यांनी घसरला आहे. मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत निकाल जाहीर करताना कॉपीमुक्त मोहिमेच्या कठोर अंमलबजावणीमुळे निकालात घट झाल्याचे स्पष्ट केले, मात्र त्यामुळे शिक्षणातील पारदर्शकता व गुणवत्ता वाढीस चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील नऊ विभागांपैकी कोकण विभागाने ९४.१४ टक्के निकालासह अव्वल स्थान पटकावले आहे, तर लातूर विभाग ८४.१४ टक्क्यांसह शेवटच्या क्रमांकावर राहिला आहे. पुणे विभागाचा निकाल ९१.२५ टक्के, नागपूर ८८.६७, छत्रपती संभाजीनगर ८८.६८, कोल्हापूर ८९.९७, अमरावती ९०.९२, नाशिक ९०.७२ आणि मुंबई ९०.०८ टक्के असा लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी बाजी मारत ९३.२५ टक्के उत्तीर्णता नोंदवली असून मुलांची टक्केवारी ८६.८० टक्के आहे. मुली मुलांपेक्षा तब्बल ६.३५ टक्क्यांनी पुढे आहेत. यंदा राज्यभरातून १४ लाख ४४ हजार ७१३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४ लाख ३३ हजार ५८ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि १२ लाख ८६ हजार ८४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकूण १५३ विषयांपैकी २६ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. खाजगी विद्यार्थ्यांची उत्तीर्णता ८०.२१ टक्के, तर पुनर्परीक्षार्थींची ३६.४४ टक्के इतकी राहिली आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांनी ९०.५८ टक्के उत्तीर्णता नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कॉपी रोखण्यासाठी यंदा राज्यभर कडक उपाययोजना करण्यात आल्या होत्या. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही देखरेख, कठोर नियंत्रण आणि शिस्तबद्ध व्यवस्था राबवण्यात आली. या काळात १५ एफआयआर दाखल करण्यात आले असून पान ४ वर

## हवामान विभागाच्या अंदाजानुसार
## उष्णतेचा कहर कायम;यंदा मान्सून लवकरच

मुंबई/प्रतिनिधी- राज्यात उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून, तापमानाने पुन्हा एकदा ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यभर उष्णतेचा इशारा देत हिट वेव्हचा अलर्ट जारी केला आहे. मुंबईसह कोकण, मराठवाडा आणि विदर्भात उष्णतेच्या झळा अधिक तीव्र होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान यंदा मान्सून १४ ते १६ पर्यंत अंदमानात दाखल होईल, असेही हवामान विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे.

हवामान विभागाचे महासंचालक एम. महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, मे महिन्यात तापमानाचे चित्र मिश्र राहणार आहे.काही भागांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. गुजरात आणि महाराष्ट्रात काही दिवस तापमान झपाट्याने वाढू शकते. त्यामुळे नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुंबई आणि कोकण पट्ट्यात उष्ण व दमट हवामान कायम राहणार असून, हवेतील आर्द्रता ७० ते ८० टक्क्यांपर्यंत राहण्याची शक्यता आहे. दमट उष्णतेमुळे नागरिकांना उकाड्याचा अधिक त्रास जाणवत आहे.मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या भागातही तापमानाचा पारा चढलेला असून, ३७ ते ४० अंशांच्या दरम्यान तापमान नोंदवले जात आहे. या भागात हवामान कोरडे राहणार असून, काही ठिकाणी उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रात उन्हाचा तडाखा कायम असून, कमाल तापमान ४० अंशांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या भागात वादळी पावसाचा कोणताही अंदाज नसून हवामान कोरडे राहणार आहे. मराठवाडा पान ४ वर

## मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून ऑपरेटरचा मृत्यू;घात की अपघात..?



माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील जुनापाणी येथे एका कन्स्ट्रक्शन साईटवर अत्यंत धक्कादायक घटना घडली असून, मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून एका ऑपरेटरचा मृत्यू झाल्याची घटना आज (दि.२ मे, शनिवार) उघडकीस आली आहे. या प्रकरणी माहूर पोलिसात बातमी लिहेपर्यंत नोंद करण्यात आली नाही. हा घात की अपघात?, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

मौजे जुनापाणी नजीक असलेल्या एका कन्स्ट्रक्शन कंपनीच्या साईटवर ही दुर्दैवी घटना घडली. झारखंड राज्यातील जोंगी (ता.चंदवारा, जि.कोंडरमा) येथील अजीत यादव (वय ३५) हा संबंधित साईटवर ऑपरेटर म्हणून कार्यरत होता. साईटवरील मजुरांच्या माहितीनुसार, मागील दहा दिवसांपासून जनरेटर बंद असल्याने वीजपुरवठा खंडित होता. त्यामुळे प्रचंड उष्णतेत काम करणाऱ्या शेकडो मजुरांना रात्री झोपण्यासाठी योग्य सुविधा उपलब्ध नव्हत्या. पंखे नसल्याने अनेक मजूर मोकळ्या जागेत झोप घेत असल्याचे वास्तव समोर आले आहे. दि.१ मे रोजी रात्री सुमारे ९ वाजताच्या सुमारास अजीत यादव हा देखील मोकळ्या जागेत झोपण्यासाठी गेला होता. त्याचवेळी, इतर ठिकाणावरून आणलेली माती एका टिप्परद्वारे नेमक्या त्या ठिकाणी टाकण्यात आली. दुर्दैवाने, अजीत यादव त्या ठिकाणी झोपलेला असल्याने तो मातीच्या ढिगाऱ्याखाली दबला. ही बाब रात्री कुणाच्याही लक्षात आली नाही, अशी माहिती सहकारी मजुरांनी दिली. आज (दि.२ मे) सकाळी साडेआठच्या सुमारास जेसीबीच्या सहाय्याने माती दुसऱ्या टिप्परमध्ये भरत असताना मातीखालून अजीतचे पाय दिसून आल्याने ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व मृतदेह ताब्यात घेऊन माहूर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या घटनेत निष्काळजीपणा की घातपात, याबाबत विविध तर्क-वितर्क लावले जात असून, शवविच्छेदन अहवालानंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे. मात्र, घटनास्थळी उपस्थितांमध्ये घातपाताची शक्यता अधिक असल्याची चर्चा सुरू आहे.

## शिक्षिकेकडून २५ कोटींचे ड्रग्ज जप्त

मुंबई/प्रतिनिधी-महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय)ने सुरतमध्ये मोठी कारवाई करत नाशिकच्या एका महिला शिक्षिकेकडून तब्बल २५ कोटी रुपयांचे मेथॅम्फेटामाइन ड्रग्ज जप्त केले आहे. या प्रकरणामुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे.

गुप्त माहितीच्या आधारे डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी सुरत रेल्वे स्थानकावर सापळा रचला होता. शुक्रवारी हजरत निजामुद्दीन ते दादर ही रेल्वे सुरत स्थानकावर येताच संशयित महिलेला त्यांनी ताब्यात घेतले.

## मटका अड्डयांवर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या धाडी

नांदेड/प्रतिनिधी-पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने अवैध धंद्या विरुध्द कारवाईचे सत्र सुरु केले आहे. शुक्रवारी नांदेड व देगलूर येथील मटका अड्ड्यांवर धाडी टाकुन मटका किंगसह बारा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या निर्देशनावरुन सपोनी वसंत आरसेवार व पोलीस कर्मचाऱ्यांनी शुक्रवार दि.१ मे रोजी भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील कल्याणनगर भागात सुरु असलेल्या मटका अड्डयावर छापा टाकला. मटका घेणाऱ्या तीन जणांना अटक करुन त्यांच्याकडून मटका घेण्याचे साहित्य व रोख रक्कम ४३ हजार रुपये जप्त करण्यात आले. सदरील मटका हा मटका किंग अनवर अलीखान अकबर अलीखान रा.खडकपूरा, कमल यादव रा.वजीराबाद, वेणु कांबळे व रोहन कांबळे हे घेत होते. तसेच स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या दुसऱ्या पथकाने फौजदार नागनाथ तुकडे यांच्या नेतृत्वाखाली देगलूर शहरातील रोहीदास चौकात टीन शेडमध्ये सुरु असलेल्या मटका अड्डयावर धाड टाकुन दोन जणांना अटक केली. त्यांच्याकडून मटका घेण्याचे साहित्य व रोख २५ हजार ५७० रुपये जप्त करण्यात आले. या प्रकरणी पोलीसांनी शेख इस्माईल शेख मुनीर रा.मातुळ ता.भोकर, धम्मदीप थोरात रा. वारंगा फाटा, विठ्ठल जळबाजी कोल्हे रा.कासारखेडा, पान ४ वर

## नांदेड-नाळेश्वर-जैतापूर रस्त्यावर अपघाताची मालिका सुरुच
### वाळूसह 'समृद्धी'च्या हायवांची बेसुमार वाहतूक;महिन्याभरात तीघांचा बळी

नांदेड/प्रतिनिधी-नाळेश्वर-जैतापूर मार्गावर अवजड वाहनांच्या बेफाम वाहतुकीमुळे अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही.जालना समृद्धी महामार्गाच्या कामासाठी मुरुम वाहतुकीसह वाळू माफियांची बेकायदेशीर हालचाल वाढल्याने या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, गेल्या महिनाभरात तीन जणांचा बळी गेला आहे.

जालना समृद्धी महामार्गाच्या कामासाठी लागणारा मुरुम नांदेड-नाळेश्वर-जैतापूर मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहून नेला जात आहे. दररोज सुमारे २०० ते २५० हायवा व टिप्पर वाहनांची दिवस-रात्र वाहतूक सुरू आहे. त्यातच वाळू माफियांची भर पडल्याने रस्त्यावर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. परिणामी, रस्त्यावर ठिकठिकाणी गुडघाभर खड्डे पडले असून, सामान्य वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.आधीच अरुंद असलेल्या या मार्गावर अवजड वाहनांची सततची वर्दळ वाढल्याने अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. मागील महिन्यात घडलेल्या विविध अपघातांत तिघांचा मृत्यू झाला असून, अनेकजण जखमी झाले आहेत. या घटनांमुळे नाळेश्वर-जैतापूर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत, समृद्धी महामार्गाचे काम सुरू ठेवण्यास हरकत नसली तरी मुरुम वाहतूक अन्य पर्यायी मार्गाने वळवावी, अशी मागणी केली आहे. तसेच, जिल्हा प्रशासनाने तात्काळ या रस्त्याची दुरुस्ती करून अवजड वाहनांवर नियंत्रण आणावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, येत्या १५ दिवसांत प्रशासनाने ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण आंदोलन छेडण्यात येईल.असा इशारा नाळेश्वर, जैतापूर, सोमेश्वर, ढोकी, पिंपरण, बोरगाव आदी गावांतील नागरिकांनी दिला आहे.

## नांदेड येथे ४ रोजी प्रा.श्याम मानव यांचे 'बुवा तेथे बाया' विषयावर व्याख्यान



नांदेड/प्रतिनिधी- समाजातील अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि विशेषतः महिलांची होणारी फसवणूक या गंभीर सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकण्यासाठी बुवा तेथे बाया या विषयावर जाहीर व्याख्यान सोमवार दि.४ मे रोजी सायं.६.३० वाजता शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे आयोजित केले आहे. या व्याख्यानासाठी प्रख्यात विचारवंत तसेच अं. नि. समितीचे संस्थापक संघटक प्रा. श्याम मानव प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या व्याख्यानात भोंदू बुवा व ज्योतिषी महिलांना कशा प्रकारे जाळ्यात ओढतात, त्यांना दिली जाणारी प्रलोभने, तसेच त्यांच्या माध्यमातून होणारे शारीरिक आणि आर्थिक शोषण यावर सविस्तर चर्चा केली जाणार आहे. तसेच ढोंगी बाबांची ओळख कशी पटवावी, जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत कारवाईची प्रक्रिया काय आहे, यासोबतच प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित प्रकरणांचे विश्लेषणही प्रा. मानव सादर करणार आहेत. हा कार्यक्रम अ.भा.अंधश्रद्धा निर्मूलन समिती,नांदेड व समविचारी पक्ष आणि संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अॅड. कॉ. प्रदीप नागापूरकर, फारुख अहेमद, प्रा. इरवंत सूर्यकार, प्रा. देविदास इंगळे, मा. दत्ता तुम्मावड, कॉ. उज्वला पडलवार, प्रा. व. ना. गोंडगावकर, प्राचार्य दळवे, सपना टेमके, डि. एन. मोरे खेरेकर, बाळाजी पाटोळे, प्रा. नरेश भिसे, बाळाजी गायकवाड, अॅड. सत्यकुमार जाधव, कॉ. लता गायकवाड, संकेत पाटील यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील सेतू महाऑनलाईन व आपले सरकार सेवा केंद्र ४ दिवसापासून बंद

बी.आर.पांचाळ

भोकर- तहसील कार्यालयातून मिळणाऱ्या सर्व कागदपत्रांचे काम सेतू महा ऑनलाईन व आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून करण्यात येते. मात्र गेली ४ दिवसापासून जिल्ह्यातील ३५० हून अधिक सेतू सुविधा केंद्र बंद असल्याने नागरिकाची कामे खोळंबली आहेत.

जिल्ह्यातील सर्वच तहसील कार्यालयामध्ये व जिल्हाधिकारी कार्यालयात सेतू सुविधा मार्फत अनेक कागदपत्र काढले जातात. शेतकरी वर्गाचे देखील अनेक कामे या केंद्रामार्फत होतात भोकर तालुक्यासह जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात सेतू सुविधा केंद्र २८, २९,३० एप्रिल १ मे रोजी बंद असल्याने विद्यार्थ्यांची व नागरिकांची अनेक कामे खोळंबली आहेत.सध्या विद्यार्थ्यांचे अनेक कागदपत्र काढण्यासाठी गर्दी आहे. जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, आधार कार्ड अपडेट करणे, शेतकरी अनुदान उचलण्यासाठी केवायसी करणे, शेतकऱ्यांचे विविध कामे त्यासाठी लागणारे प्रमाणपत्र, विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी लागणारी कागदपत्र, असे सर्व कागदपत्रे सेतू सुविधा केंद्र मधून करण्यासाठी विद्यार्थी नागरिक व शेतकऱ्यांची तारांबळ उडालेली आहे. मात्र दोन दिवसापासून सेतू सुविधा केंद्र बंद असल्याने कोणतीच कामे झालेली नाहीत.

**जिल्ह्यातील ३५० हुन अधिक सेतू सेवा केंद्र बंद**

जिल्ह्यातील १६ तालुक्यात असणारी ३५० हून अधिक सेतू सुविधा केंद्र मागील ४ दिवसापासून बंदच आहेत त्यामुळे सर्वच कामे खोळंबली असून नागरिक तहसील कार्यालयात चकरा मारून परत जात आहेत. सेतू सुविधा केंद्रावर जाऊन विचारत आहेत. मात्र साईटच बंद असल्यामुळे कोणतेही काम सुविधा केंद्रावर होत नाही. विविध महत्त्वाचे कागदपत्र काढण्यासाठी या केंद्रावर मोठी गर्दी होत असून कुठलीच कामे होत नसल्याने विद्यार्थी नागरिक व शेतकरी त्रस्त झाले आहेत. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी विविध प्रमाणपत्र काढणे प्रवेशाची तयारी करून ठेवणे यासाठी लागणारी कागदपत्र मिळत नसल्यामुळे अडचणी निर्माण झाले आहेत.

शासनाच्या विविध कागदपत्रांची कामे करण्यासाठी सेतू सुविधा केंद्र मार्फत कागदपत्र दाखल करावी लागतात त्यानंतरच विविध प्रमाणपत्र मिळतात. शपथपत्र देखील करावे लागते महाऑनलाईन केंद्र चालकांना याबाबतीत विचारणा केली असता मेंटेनन्सचे काम चालू आहे, असे सांगण्यात येत असून ४ दिवस एक केंद्र बंदच होते. पुढे सुद्धा ३ दिवस सुट्ट्या आहेत असे पान ४ वर

## बारावी परीक्षेत नांदेड जिल्ह्याचा ७७.७० टक्के निकाल

नांदेड/प्रतिनिधी-इयत्ता बारावी परीक्षेचा ऑनलाईन निकाल आज (शनिवार) दुपारी जाहीर करण्यात आला आहे. यंदा नांदेड जिल्ह्याचा टक्का घसरला असून ७७.७० टक्के निकाल लागला आहे.

बारावी परीक्षेसाठी नांदेड जिल्ह्यातून एकूण ४० हजार ५२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यामध्ये मुलांची संख्या २१ हजार ७४३ तर मुलींची संख्या १८ हजार ७८० इतकी होती. यंदा १५ हजार ८९० मुले बारावी परीक्षेत उत्तीर्ण झाले असून १५ हजार ५९९ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात बारावी परीक्षेत विज्ञान शाखेचा ८८.८२ टक्के, वाणिज्य शाखेचा ७०.६४ टक्के, वोकेशनल ६६.७४ आणि कला शाखेचा ६०.११ टक्के निकाल लागला आहे. गेल्या वर्षी पेक्षा यंदा नांदेड जिल्ह्याचा टक्का पंधरा टक्यांनी घसरला आहे. नांदेड जिल्ह्यातील तालुक्या पैकी अर्धापूरचा निकाल ९४ टक्के लागला आहे. कंधार ६३.१६, नांदेड तालुका ८३.७१, भोकर ८२.२८, बिलोली ८८.९४, देगलूर ६३.६२, धर्माबाद ७८.६३, हदगाव ७२.९५, हिमायतनगर ७८.६४, किनवट ७९.५०, लोहा ६५.२६, माहूर ७५.०२, मुखेड ८२.७२, मुदखेड ९१.४२, नायगाव ७७.७५, उमरी ८६.६८ टक्के निकाल लागला आहे.

# वाहतूक कोंडी की,सत्ताधीशांची कोंडी?

**लोकशाहीत सत्ता ही जनतेच्या सेवेसाठी असते, हे तत्त्व कागदावर जितके ठळक दिसते, तितकेच ते प्रत्यक्षात पाळले जाते का?, हा प्रश्न पुन्हा एकदा निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी संसदेच्या विशेष अधिवेशनात सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने महिला आरक्षणासह काही महत्त्वाची विधेयके मांडली. मात्र, अपेक्षित संख्याबळ नसल्यामुळे ही विधेयके पारित होऊ शकली नाहीत. या घटनेनंतर राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आणि त्यातूनच महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर मोर्चांचे आयोजन करण्यात आले. मुंबईसारख्या आधीच ताणलेल्या वाहतूक व्यवस्थेच्या शहरात अशा प्रकारचे मोर्चे काढताना प्रशासनाने अधिक जबाबदारीने वागणे अपेक्षित असते. परंतु प्रत्यक्षात घडले त्याच्या उलट. मोर्चामुळे निर्माण झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीत हजारो नागरिक अडकले. या परिस्थितीत एका महिलेने संतप्त होऊन थेट राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांना सुनावलेले शब्द हे केवळ तिच्या वैयक्तिक भावनांचे प्रतीक नव्हते, तर त्या क्षणी अडकलेल्या प्रत्येक सामान्य नागरिकाचा तो आवाज होता. याच धर्तीवर अलीकडे मुंबईपुणे द्रुतगती मार्गवरील ''मिसिंग लिंक''उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळीही गंभीर परिस्थिती निर्माण झाली. सलग सुट्ट्या, वाढते तापमान आणि मोठ्या प्रमाणातील प्रवासी, यामुळे आधीच ताण असताना उद्घाटन सोहळ्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. तीन ते साडेतीन तास नागरिकांना उन्हात अडकून राहावे लागले. लहान मुले, वृद्ध, आजारी प्रवासी सर्वांनाच याचा त्रास सहन करावा लागला. या वाहतूक कोंडी दरम्यान एक वेगळाच प्रसंग समोर आला. सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या खासदार, या स्वतः सुमारे दोन ते अडीच तास या कोंडीत अडकल्या होत्या. त्यांनी यासंदर्भात एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करत ''या दोन-अडीच तासांत मला काही नवे मित्र मिळाले'' अशा आशयाची हलकीफुलकी प्रतिक्रिया दिली. हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आणि त्याची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. त्यांनी ''सुप्रियाताई, तुम्हाला पुन्हा अशा प्रकारे अडकावे लागणार नाही'' असे आश्वासन दिले. सुप्रिया सुळे यांच्या अनुभवाची दखल घेणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या घामाची, त्रासाची आणि असहायतेचीही तितक्याच गांभीर्याने दखल घ्यावी, ही अपेक्षा मात्र अधिक ठळकपणे पुढे येते.या घटनेनंतर मुख्यमंत्री यांनी माफी मागितली, हे स्वागतार्ह आहे. परंतु प्रश्न केवळ माफीपुरता मर्यादित नाही. मूलभूत प्रश्न आहे तो नियोजनाचा. अशा मोठ्या कार्यक्रमांपूर्वी वाहतूक व्यवस्थेचा सखोल आढावा घेणे, पर्यायी मार्गांची आखणी करणे, आणि नागरिकांना पूर्वसूचना देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. मग ती पार पाडण्यात का अपयश येते? यामागे दोन प्रमुख कारणे दिसून येतात. पहिले म्हणजे राजकीय कार्यक्रमांना दिले जाणारे प्राधान्य. अनेकदा सार्वजनिक सोयी-सुविधांपेक्षा नेत्यांच्या कार्यक्रमांचे वेळापत्रक आणि सोयी महत्त्वाच्या ठरतात. दुसरे म्हणजे प्रशासनातील समन्वयाचा अभाव. वाहतूक विभाग, स्थानिक प्रशासन आणि पोलिस यांच्यातील समन्वय योग्य पातळीवर होत नसल्याचे वारंवार दिसून येते. उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर बनते. राज्यात विक्रमी तापमान नोंदवले जात असताना नागरिकांना तासन्तास रस्त्यावर अडकवणे हे केवळ गैरसोयीचे नाही, तर धोकादायकही आहे. अशा परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची, वैद्यकीय मदतीची कोणतीही व्यवस्था नसणे ही प्रशासनाची गंभीर चूक म्हणावी लागेल. या घटनांमधून एक स्पष्ट संदेश मिळतो; सामान्य नागरिकांचा वेळ, श्रम आणि सुरक्षितता यांना पुरेसे महत्त्व दिले जात नाही. लोकशाहीत नागरिक केंद्रस्थानी असायला हवा, परंतु प्रत्यक्षात तो अनेकदा दुय्यम ठरतो. त्यामुळे ''वाहतूक कोंडी'' ही केवळ रस्त्यावरची समस्या नसून ती सत्ताधाऱ्यांच्या निर्णयक्षमतेतील कोंडीचे प्रतीक ठरते.यावर उपायही अवघड नाहीत. मोठे कार्यक्रम आणि मोर्चे हे शहराबाहेर किंवा नियंत्रित क्षेत्रात आयोजित करणे, वाहतुकीसाठी स्वतंत्र योजना आखणे, आणि तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना वेळेवर माहिती देणे हे सर्व उपाय तातडीने राबवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रशासनाने ''जनतेचा वेळ हा देखील मौल्यवान आहे'' ही जाणीव मनात बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी, या घटनांकडे केवळ अपघाती त्रुटी म्हणून न पाहता त्यातून धडा घेणे गरजेचे आहे. सत्ताधाऱ्यांनी जनभावनांचा आदर करत, नियोजनक्षम आणि जबाबदार प्रशासनाची दिशा स्वीकारली, तरच अशा कोंडीतून मार्ग निघू शकतो. अन्यथा, रस्त्यावरील कोंडी ही सत्ताधाऱ्यांच्या धोरणात्मक कोंडीचीच पुनरावृत्ती ठरत राहील.**

# शिवाजी महाराजांविषयी वादग्रस्त विधान; धीरेंद्र शास्त्रींवर कठोर कारवाईची मागणी

**रमेश लांजेवार**
नागपूर.

भारत भुमि ही महाज्ञानी, साधु, संत,थोर महात्मे, तपस्वी, क्रांतिकारक, विचारवंत ,जहालवादी-मवाळवादी यांच्या अथक परिश्रमाने आणि प्रयत्नांना ही भारत भुमि निर्माण झाली आहे. या भुमित देव-दानव, देवीदेवतांनी जन्म घेतला त्यामुळेच जगाच्या पाठीवर भारत असा देश आहे की या भुमित अनेक धर्म,पंथ,जाती,भाषा,वेगवेगळी संस्कृती पहायला मिळतात आणि याला आकार व दिशा देण्याचे काम हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या गनिमी काव्याच्या माध्यमातून हिंदवी स्वराज्याची स्थापना करून केले आहे.आजही शिवाजी महाराजांचा इतिहास अजरामर आहे. देशासह जगातील १११ देश शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी करतात आणि शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचा व त्यांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी विदेशी अभ्यासक महाराष्ट्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणात येतात.कारण शिवाजी महाराजांसारखी युध्द शैली कोणीही अवगत करू शकले नाही आणि धीरेंद्र शास्त्री म्हणतात की, शिवाजी महाराज युद्ध करून थकले, अरे मुर्ख धीरेंद्र शास्त्री बाबा शिवाजी महाराज कधीच थकले नाहीत त्यामुळेच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.आज आपण जगात जे गोरीला युध्द पहातो त्याची सुरुवात याच मातीतून छत्रपती शिवाजी महाराजांनी केली आणि जगभरात पसरली.परंतु आज देशात धीरेंद्र शास्त्री सारखे जहरीले विषारी साप सुद्धा दिसून येतात. आपण काय बोलत आहोत याचेही भान स्वयंघोषित बाबा धीरेंद्र शास्त्री यांना नसल्याचे दिसून येते.

नागपूरातील एका कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्रीने वादग्रस्त वक्तव्य शिवाजी महाराजांबद्दल बोलतांना म्हणतात की, शिवाजी महाराज युद्ध करून थकले आणि रामदास स्वामींना म्हणाले,राजपाट सांभाळा.अरे मुर्ख धीरेंद्र बाबा रामदास स्वामी हे शिवाजी महाराजांचे गुरू होते आणि स्वामींचा आशीर्वाद व त्यांच्याशी विचार विमर्श नेहमीच छत्रपती शिवाजी महाराज करायचे आणि मोठ्यांचा आशीर्वाद घेण्याची परंपरा आमच्या महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात हजारो वर्षापासुन आहे.त्यामुळे रामदास स्वामींच्या आदेशाचे पालन शिवाजी महाराज नेहमीच करायचे.कारण रामदास स्वामी शिवाजी महाराजांचे गुरू होते. धीरेंद्र शास्त्री बाबा आज जो तुम्ही मोकळा श्वास घेत आहात ना तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुंण्यायीनेच घेत आहात ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे.या पृथ्वीतलावर जर शिवाजी महाराज जन्माला आले नसते तर तुम्हीही दिसले नसते.त्यामुळे तुम्ही ज्या ताटात खाता त्याला वारंवार छिद्र पाडणे बंद करावे व माफी मागुन पळवाटा काढणे बंद करावे. आपण स्वतःला महाग्यानी बाबा आणि हिंदू धर्माचे सर्वेसर्वा समजतात मग आपल्या तोंडून चुकीचे आणि लोकांच्या भावना दुखावणारे वक्तव्य कशी काय निघतात! याचेही आम्हाला आश्चर्य वाटते.परंतु आपणाला प्रसिद्धी पाहिजे असते म्हणून आपण असे वादग्रस्त वक्तव्ये करतात ही बाब आता सर्वांच्या लक्षात आली आहे.मिडियामध्ये आपल्याला प्रसिद्धीसाठी आपल्याला स्थान मिळावे यासाठी आपण वारंवार वादग्रस्त वक्तव्ये करून प्रसिद्धी मिळावीत असतात ही बाब जगजाहीर आहे आणि




नंतर माफी मागुन पळ काढतात हेही सर्वांना लक्षात आले आहे.या अगोदरही धीरेंद्र शास्त्री यांनी अशीच वादग्रस्त वक्तव्ये करून देशाच्या भोळ्याभाबड्या जनतेची दिशाभूल करून भावना दुखावल्या होत्या. एका प्रवचन दरम्यान धीरेंद्र शास्त्रींनी सलग दोन दिवस मानवधर्माचे संस्थापक बाबा जुमदेवजी आणि परमात्मा एक सेवक धर्माबाबत आक्षेपार्ह विधान केल्याने हजारो सेवक संतप्त झाले होते.धीरेंद्र शास्त्रीने या आधी संत साईबाबा,संत तुकाराम महाराज व भगवान सहस्त्रार्जुन महाराज अशा अनेक संतांबद्दल व देवतांबद्दल आक्षेपार्ह विधान केलेले आहे.ही अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय बाब आहे याचा सर्वच स्तरातून निषेध सुद्धा करण्यात आला होता.तरीही त्यांचा वादग्रस्त वक्तव्ये करण्याचा गोरख धंदा बंद झालेला नाही. धीरेंद्र शास्त्री स्वतःला महाराज(बाबा) समजतात;परंतु त्यांच्यात तसा कोणताही गुण दिसत नाही. फक्त समाजात फूट पाडून कटुता निर्माण करून जहर पसरविण्याचे काम करतात व स्वतःला प्रसिद्धी मिळावी या उद्देशाने त्यांचे प्रवचन असते हे त्यांच्या आक्षेपार्ह वक्तव्यावरून स्पष्ट दिसून येते.देशातील कोणताही व्यक्ती असो प्रत्येक व्यक्ती आपापल्या पद्धतीने देवीदेवतांची व साधुसंतांची पुजा अर्चना करीत असतो आणि मानतो व हा त्यांचा अधिकार आहे.त्यात बागेश्वर बाबा सारखे महाराज जहर घोळण्याचे कार्य करीत असेल तर हिंदू धर्म कदापि सहन करणार नाही. परंतु दुःखची व चिंताजनक बाब म्हणजे धीरेंद्र शास्त्री राज्यात येवून वारंवार वादग्रस्त वक्तव्ये करून माफी मागतात आणि निघून जातात तरी सुद्धा सरकार त्यांना पाठीशी घालत असुन त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई करीत नाही ही अत्यंत गंभीर बाब म्हणावी लागेल. कोणताही गुन्हेगार असो तो गुन्हा करतो आणि नंतर माफी मागतोच म्हणून काय धीरेंद्र शास्त्री सारख्या गुन्हेगाराला मोकळे सोडायचे काय? याचाही विचार सरकारने केला पाहिजे. याचप्रकारे गुन्हेगारांनी नेहमीच माफी मागितली तर त्या सर्वांनाच मोकळे सोडणार काय!

असे अनेक प्रश्न निर्माण होतात.आजपर्यंत धीरेंद्र शास्त्रीने करोडो लोकांची मने दुखावली त्याचे काय?ही गोष्ट सत्य आहे की शिवाजी महाराजांच्या पुंण्यायीनेच आज बागेश्वर बाबा आपली बाबागीरी करीत आहे अन्यथा कटोरा घेऊन दारोदारी फिरावे लागले असते.आज धीरेंद्र शास्त्री इतिहासाला मलिन करणारे विषेली बाबा झाले आहेत.त्याचप्रमाणे धर्मा-धर्मात फुट पाडण्याच्या उद्देशाने धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणतात की, देशातील नागरिकांनी चार मुले जन्माला घालायला हवीत व त्यातील एक मुलगा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला द्यायला हवा.कारण येणाऱ्या काळात हिंदूंनी आपली लोकसंख्या वाढविली नाही तर येणाऱ्या काळात हिंदूंचे अस्तित्व धोक्यात येईल असे सांगत किमान तीन ते चार मुले जन्माला घालण्याचे आव्हान शास्त्री यांनी केले.या गोष्टीला मी मानतो. परंतु याची सुरुवात धीरेंद्र शास्त्रींनी सर्वप्रथम चार मुले जन्माला घालुन करावी नंतर लोकांना ग्यान द्यावे. धीरेंद्र शास्त्री म्हणतात की हिंदूंची संख्या कमी होत आहे याकरीता चार मुले जन्माला घालने आवश्यक आहे.ही बाब धीरेंद्र शास्त्रीची आपण मान्य केली तर त्या मुलांच्या पालनपोषणाचा खर्च कोण करणार याबद्दल बागेश्वर बाबाचे मौन का? आम्ही चार मुले जन्माला घालायला तयार आहोत. त्यातील एक मुलगा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला सुध्दा देण्यास तयार आहोत.परंतु मुलांच्या पालनपोषणाचा खर्च, शिक्षणाचा खर्च व त्यांच्या पुढील आयुष्याचा खर्च कोण उचलणार याचाही खुलासा व्हायला पाहिजे.ह्या सर्व गोष्टी उचल्लि जिभ लावली टाळ्याला या पद्धतीची आहे.आजही देशात भुकमरी, अतिदुर्गम भागात कुपोषण, महागाई, बेरोजगारीची समस्या,आरोग्याची समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, शैक्षणिक समस्या, वृद्धांची समस्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे याकडे लक्ष न देता धीरेंद्र शास्त्री चार मुले जन्माला घालण्याचे आव्हान करतात ही तर बुद्धी भ्रष्ट झाल्याची निशानी दिसून येते.आजच्या परिस्थितीत एका मुलाचे पालनपोषण करणे कठीण आहे आणि धीरेंद्र शास्त्री म्हणतात चार मुले जन्माला घाला हे सर्व मुर्खपणाचे लक्षण आहे.धीरेंद्र शास्त्री याचे नागपूरातील अनेक वादग्रस्त वक्तव्ये लक्षात घेता नागपूरच्या प्रसिद्ध छिंदवाडा रोडवरील दवाखान्यात त्यांनी उपचार घ्यायला पाहिजे.परंतु त्यांनी आतापर्यंत केलेल्या वादग्रस्त वक्तव्ये लक्षात घेता त्यांच्यावर कठोर कारवाई होणेही गरजेचे आहे.कारण त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे करोडो लोकांची मने दुखावली आहेत.याकरीता सरकारने धीरेंद्र शास्त्री यांच्या जिभेवर आवर घालावा.जय हिंद.

# गरीब शेतकऱ्यांचं तुप म्हणजे करडीचे तेल

गरीब शेतकऱ्यांचं खाण्यात तूप म्हणजे करडीचे तेल समजले जाते. सध्या देगलूर तालुक्यात करडी या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात झाली असं देगलूर शहर व तालुक्यातील खानापूर, शहरातील अनेक ऑइलमिल मध्ये शेतकऱ्यांची करडी गाळण्यासाठी लगबग दिसत आहे.



करडीचे तेल हे खाण्यासाठी खूप उपयोगी तेल म्हणून समजले जाते. याकरडीच्या तेलापासून अनेक रोग दूर होतात व शरीरातील कोलेस्टर कमी करण्याचे काम हे करडीचे तेल खाल्ल्यामुळे होते? करडीचे तेल हे शरीरासाठी अति गुणकारी म्हणून समजले जाते. सध्याला बाजारात अनेक ब्रँडचे फॉर्च्यूनर तेल वापरले जाते त्या तेलामध्ये २० टक्के केमिकल वापरल्यामुळे हे तेल पाण्यासारखे शुद्ध दिसते असे तेल खाल्ल्यामुळे हृदयविकाराच्या बिमारी खूप प्रमाणात वाढले आहेत. तरी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात दरवर्षी एक दोन एकर करडी ची लागवड शेतकरी करतात.

या पिकांची लागवड करून त्या करडीचे तेल गाळून वर्षभर वापरल्यास हृदयविकाराच्या बिमारी पासून आपण सुरक्षित राहाल असे तज्ञांचे म्हणणे आहे. सध्याला १०० किलो करडी पासून २० ते २४ किलो शुद्ध तेल निघत आहे. बाजारात करडीचे भाव ५००० रुपये क्विंटल भेटत आहे. बाजारातील भेसळीत तेल दोनशे रुपयांनी मिळत आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील करडी गाळून वर्षभर तेल वापरल्यास अनेक विमाने पासून दूर राहता येईल व आपले कुटुंबातील व्यक्तीचे शरीर निरोगी ठेवता येईल.

**एक क्विंटला २३ ते २५ किलो तेल;हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत**

करडीच्या तेलात ओमेगा सहा फॅटी ॲसिडिटी चे प्रमाण जास्त असते. जे मानवी शरीराला आवश्यक असलेले एक फायदेशीर फॅटी ॲसिड आहे. लिनोलीक ॲसिड असते. हे ॲसिड शरीरात कोलेस्ट्रॉलचे संतुलन राखण्यास मदत करते. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी मदत करते.

**-डॉ.अविनाश नामावर**
हनमान्लू क्लिनिक देगलूर

# माहूर शहरात पक्ष्यांसाठी जलपात्र,तर प्रवाशांसाठी पाणपोईची व्यवस्था!

## नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा स्तुत्य उपक्रम

माहूर/प्रतिनिधी- रखरखत्या उन्हात जीवसृष्टीला दिलासा देण्याच्या उद्देशाने माहूर शहरात एक सामाजिक जाणीवेचा उपक्रम राबविण्यात आला आहे. पक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी,यासाठी शहर परिसरातील सुमारे १०० ठिकाणी झाडांवर जलपात्र ठेवण्यात आले आहेत.

यासोबतच, उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन स्व. आमदार मा. प्रदीपजी नाईक यांच्या स्मरणार्थ, माहूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने टी-पॉईंट व बसस्थानक परिसरात प्रवासी, नागरिक तसेच तीर्थक्षेत्र माहूर येथे ग्रामीण भागातून येणाऱ्या भाविकांसाठी थंड पाण्याच्या पाणपोईची व्यवस्था करण्यात आली आहे. या पाणपोईचे उद्घाटन जिल्हा परिषद शाळेतील सहशिक्षक देशपांडे सर व सुनील कांबळे सर यांच्या हस्ते संपन्न झाले. सध्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या उन्हामुळे नागरिकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागत आहे. उदरनिर्वाहासाठी अनेकांना घराबाहेर पडणे अपरिहार्य असते. माहूर परिसरात विविध गावांचा संपर्क असल्याने शेतमजूर, कामगार, प्रवासी व भाविकांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत प्रत्येकाला बाटलीबंद पाणी विकत घेणे शक्य नसते. त्यामुळे अनेकांची तहान आर्थिक अडचणींमुळे भागत नाही.याच पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. स्व. आमदार प्रदीप नाईक यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेली ही पाणपोई नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरत आहे.या प्रसंगी नगराध्यक्ष फिरोज दोसानी, सभापती विजय कामटकर, सभापती प्रतिनिधी माजी नगरसेवक रफीक सौदागर, नगरसेविका प्रतिनिधी इरफान सय्यद अफसर अली, आकाश कांबळे, जावेद दोसानी, चेतन जाधव, सुनील आडे, गजानन जैस्वाल, तानू भाई



आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून उष्णतेत होरपळणाऱ्या नागरिकांना दिलासा देत सेवाभाव जपण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# पालकमंत्र्यांच्या हस्ते श्री गुरु गोबिंदसिंघजी स्मारक रुग्णालयात एमआरआय मशीनचे लोकार्पण



नांदेड/प्रतिनिधी- महाराष्ट्र दिनाचे औचित्यसाधून सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनातर्फे श्री गुरु गोबिंदसिंघजी स्मारक जिल्हा रग्णालयातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने, पी.पी.पी. पद्धतीने कृष्णा डायग्नोस्टिक्स बाह्यस्त्रोत एजन्सीद्वारे नव्याने बसवण्यात आलेल्या अत्याधुनिक एमआरआय मशीनचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी मोठ्या उत्साहात पार पडला. या सुविधेमुळे आता जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना महागड्या खाजगी रुग्णालयात न जाता, शासकीय रुग्णालयात उच्च दर्जाची सेवा मोफत उपलब्ध होणार आहे.

या सुविधेचे उद्घाटन नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश अबीटकर यांच्या हस्ते महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यातील एमआरआय तपासणी सुविधेचे लोकार्पण ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. याप्रसंगी आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंद तिडके पाटील बोंढारकर, माजी आ.अमर राजुकर, संतुकराव हंबर्डे, प्रवीण साले , अ‍ॅड. किशोर देशमुख इत्यादी प्रमुख लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती होती. या उद्घाटन प्रसंगी पालकमंत्री अतुल सावे म्हणाले की, जिल्ह्यातील गरीब आणि गरजू रुग्णांना अत्याधुनिक आरोग्य सेवा मिळणे हा मुख्य उद्देश आहे. या नवीन एमआरआय मशीनमुळे रुग्णांना आता मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज उरणार नाही. आरोग्य सुविधांचे बळकटीकरण हे शासनाचे प्राधान्य आहे. तसेच आजपासून ही सेवा सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असेही आवाहन त्यांनी केले. सदर एमआरआय हे मशीन उच्च क्षमतेचे असून यामुळे मेंदू, मणका, सांधे आणि शरीरातील इतर अंतर्गत भागांचे अत्यंत अचूक निदान करणे शक्य होईल. खाजगी लॅबमध्ये ५ ते १० हजार रुपये खर्च येणारी ही तपासणी जिल्हा रुग्णालयात मोफत केली जाणार असून आपत्कालीन रुग्णांसाठी ही सेवा २४ तास उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, डॉ. राजाभाऊ बुट्टे, डॉ. पांडुरंग पावडे, डॉ. हनुमंत जाधव, डॉ. राष्ट्रपाल अवसरे आणि आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# अवैधरित्या गोवंश वाहतूक करणारे वाहन पोलिसांनी पकडले

माहूर/प्रतिनिधी-सिंदखेड पोलिसांनी अवैध गोवंश जनावरांची वाहतूक करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई करत एकूण २ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सिंदखेड पोलीस स्टेशनचे सपोनी जाधववर व पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करीत असतांना दि.३० एप्रिल रोजी सायंकाळी मौजे सारखाणी ते किनवट मार्गावरील सारखाणी घाटाजवळ पेट्रोलिंग दरम्यान एमएच-२९ बी.ई.-४१४५ क्रमांकाचे टाटा एस (छोटा हत्ती) वाहन संशयास्पदरीत्या जाताना आढळले. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये गोवंश जातीची जनावरे क्रूरपणे कोंबून बांधून वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत वाहनासह ४ गोवंश जप्त केली. या प्रकरणी पोलीस कर्मचारी सतीश कोडापलकुलवार यांच्या फिर्यादीवरून शेख सोहेल (रा. किनवट), संतोष मुंडे (रा. नागझरी, ता. किनवट) आणि ईश्वर जुगनाके (रा. अंजनी, ता. माहूर) यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# मांजरम येथे ५ रोजी शेतकरी ज्ञानमेळावा

नायगाव/प्रतिनिधी- शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, गट शेतीचे फायदे आणि विविध शासकीय योजनांची माहिती मिळावी या उद्देशाने स्व. संभाजी पवार शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड, नायगाव व महाराष्ट्र शासन कृषी विभाग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ५ मे रोजी मांजरम येथे भव्य शेतकरी ज्ञानमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मांजरम येथे सकाळी १० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.राजेश पवार राहणार असून, उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते होणार आहे. या ज्ञानमेळाव्यात तज्ज्ञांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. डॉ. संतोष चव्हाण हे नैसर्गिक शेती-काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच जलसंधारणावर आधारित जलतारा संकल्पनेचे जनक पुरुषोत्तम वायाळ हे जलतारा प्रकल्पाचे महत्त्व या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी जिल्हा कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, उपविभागीय कृषी अधिकारी विठ्ठल गीते, कृषी अधिकारी डी. बी. देवरे तसेच माधव तरकंटे हे विशेष उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत शेतकरी गट निर्मिती, गट शेतीचे फायदे, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दरम्यान, आयोजक पूनमताई राजेश पवार या स्वतः आधुनिक व सेंद्रिय शेतीत विविध प्रयोग करत असून, शेतकऱ्यांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत.

# बसमध्ये ज्येष्ठांना मोफत प्रवास ;पण दोन रुपयाचा स्वच्छता अधिभार

देगलूर/प्रतिनिधी-राज्य जिल्ह्यासह देगलूर तालुक्यात मार्ग परिवहन महामंडळाकडून एसटी बस प्रवाशांकडून दोन रुपये स्वच्छता अधिभार घेण्यात येत आहे. अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत ७५ वर्षांपूर्वी प्रवाशांना सरकारने तिकीट भाड्यात शंभर टक्के सवलत दिली होती. मात्र त्यांच्याकडूनही दोन रुपये घेत जात असल्यामुळे ही योजना आता मोफत राहिलेली नाही. तसेच सुट्ट्या पैशामुळे जेष्ठ नागरिक आणि वाहकात वादावादी होत आहेत.

राज्यासह देगलूर मार्ग परिवहन महामंडळाकडून कोणत्या प्रवासासाठी नियम लागू आहेत. विशेष बससेवाअंतर्गत देण्यात येणाऱ्या बससाठी प्रतिदिन प्रतिबस पन्नास रुपये आकारले जाणार आहेत. आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेअंतर्गत पासधारक प्रवाशांना पाच रुपये आकारले जातील, महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिक (७५) वर्षापर्यंतचे जेष्ठ नागरिक अमृत ज्येष्ठ नागरिक, अन्य सर्व सवलतधारी प्रवाशांकडून दोन रुपये आकारले जात आहेत. मात्र यांना अधिभारातून मिळणार सवलत विद्यार्थ्यांबाबत मासिक पास, अहिल्याबाई होळकर विद्यार्थिनी पास, मानवविकास सुट्टीच्या कालावधीत विद्यार्थ्यांना घरी जाणे यासाठी अधिभार आकारला जाणार नाही. एसटीने १५ एप्रिल २०२६ पासून प्रत्येक प्रवासी तिकिटावर दोन रुपये स्वच्छता अधिभार लागू केला आहे. एस.टी. बस स्थानके, बसच्या स्वच्छतेसाठी हा अतिरिक्त निधी वापरला जाणार आहे. मात्र काही महिन्यानंतर शौचालय सेवा जनतेसाठी मोफत होणार अशी चर्चा आहे. यावरून मोफत झाल्यास शौचालय घाण झाल्याचे त्यावेळेसच पहावयास मिळेल या निर्णयाने आता ज्येष्ठ नागरिक आणि सवलतधारकांनाही दोन रुपयाचे तिकीट काढावे लागणार आहे. मात्र विद्यार्थ्यांना यातून वगळले आहे. लाडक्या बहिणींची ही यात सुटका नाही. लाडक्या बहिणींना मोफत प्रवास असला तरी त्यांना स्वच्छता अधिभार द्यावा लागणार आहे. एस.टी.ने प्रवास करणाऱ्यात महिलांची संख्या मोठी आहे. सुट्ट्या पैशामुळे वाहक सोबत वादावादी सह दररोज होत आहेत. अनेकदा प्रवाशाकडे सुट्टी पैसे नसतात. आणि वाहकाकडेही ते उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सुट्ट्या पैशाच्या कारणावरून वाहकासोबत वादावादीचे प्रकार घडत आहेत. सध्या स्थिती सर्व आगारात ईटीआय मशीनद्वारे तिकीट विक्री होत आहे. या मशीन मध्ये असलेल्या टप्पा आणि दर पत्रकात स्वच्छता आणि भावाचा समावेश करण्यासाठी ईबिक्स टेक्नॉलॉजी सर लिमिटेडद्वारे आवश्यक ते करण्याचे काम सुरू आहे. त्यात अडचणी आल्याने प्रवासी वैतागले आहेत.

# किनवट न.पा.स्वीकृत नगरसेवकपदी प्रशांत कोरडे

किनवट/प्रतिनिधी- महाविकास आघाडीचे वर्चस्व असलेल्या किनवट नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी अखेर प्रशांत कोरडे यांची वर्णी लागली. विरोधकांच्या बाजुने यापुर्वीच महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे साजिदखान निसारखान यांची निवड झाली होती. सत्ताधाऱ्यांच्या बाजुने अनिल तिरमनवार आणि दीपक नेम्मानीवार यांनी वरपासून याच स्वीकृत नगरसेवकपदासाठी सर्वंकश प्रयत्न केले मात्र निरर्थक ठरले. शिवसेनेच्या करण एन्ड्रलवारांनी मात्र प्रशांत कोरडेंची शेवटपर्यंत साथ सोडली नसल्याने पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवार यांनी सर्व सोपस्कार पूर्ण करून बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

किनवट नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीत ज्यांनी भाजपाविरोधी रोष ओढवून महाविकास आघाडीच्या बाजुने कशाचीही तमा न बाळगता कौल देणाऱ्या अनिल तिरमनवारांना किमान स्वीकृत नगरसेवक म्हणून स्वीकारतील असा राजकीय वर्तुळातील सुज्ञानी लावलेला अनुमानही खरा ठरला नाही. दीपक नेम्मानीवार यांच्याही नावाची जोरदार चर्चा झाली. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकरांच्या राजकीय वलयातून धागेदोरे लावण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली मात्र हाती अपयश लागल्याची अखेर व्हायची तेवढी चर्चा झालीच. बड्याबड्यांच्या टक्करीत प्रशांत कोरडे सारख्या कार्यकर्त्याला स्वीकृत नगरसेवक पदाची संधी मिळाली हे नक्कीच विशेष आहे. कोरडे यांनी दिलेली साथसंगत अतुलनीय म्हणत येईल.नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक प्रशांत कोरडे यांनीही सर्वांचे आभार व्यक्त केलेत. शहर विकासाच्या बाबतीत त्यांनी सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून विकासासाठी प्रयत्नशील असेल अशी ग्वाही दिली. नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पीय उलाढालीतील स्पष्टता माध्यमापर्यंत अद्यापतरी पोहोचू दिलेली नसल्याने नगरपरिषद नफ्यात की तोट्यात हा अनुमान बांधता येणार नाही.



नांदेड मार्केट कमिटीचे माजी संचालक विठ्ठल पाटील डक व माजी नगरसेविका सौ.संगिताताई डक यांनी खा.अशोक चव्हाण, भाजपचे नांदेड प्रभारी सुनील राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. यावेळी आ.श्रीजया चव्हाण, माजी आ.अमरनाथ राजूरकर, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य देशमुख, विजय येवनकर व इतर उपस्थित होते. (छाया : धनंजय कुलकर्णी)

**टी.सी.हरवली आहे**

माझी मादुरी वरुणकुमार चंद्रकांत या नावाची १० वी पासची टी.सी. श्रीनगर येथे झेरॉक्स काढण्यासाठी गेले असतांना हरवली आहे. कृपया कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क
मो.नं.९५२९५७७९६६

# देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वात जास्त धरणे असूनही अनियमित पाणी पुरवठा का?-फिरोज अन्सारी

उमरखेड/प्रतिनिधी- देशातील धरणापैकी सर्वात जास्त धरणे महाराष्ट्रात आहेत परंतु आजही महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये नियमित व शुद्ध पाणीपुरवठा होत नसून कुठे २ दिवस कुठे ४ दिवसा आड तर कुठे ७ ते १५ दिवसाने पाणी पुरवठा करण्यात येतो.नागरिकांना पाण्याबाबत आपल्या अधिकाराची जाण नसून, कलम २१ नुसार त्यांना हे अधिकार मिळाले पाहिजेत,म्हणून मोमेंट फॉर पीस अँड जस्टिस फॉर वेलफेअर या सामाजिक संघटनेतर्फे 'पाणी हक्क' अधिकार अभियान राबविण्यात येत आहे.

राज्याच्या पॉलिसी नुसार शहरी भागात प्रति व्यक्ती १३५ लिटर पाणी तर ग्रामीण भागात ५० लिटर पाणी मिळावे असे शासकीय मानक आहे.परंतु पाण्यासाठी आपला अधिकार असताना सुद्धा आपल्याला आपल्या कष्टाच्या कमाईतून कितीतरी खर्च पाण्यावर करावा लागतो. जलजीवन मिशन अंतर्गत देशातील इतर राज्याच्या तुलनेत केंद्राने सर्वात जास्त ७ हजार कोटी रुपये देऊन २०२४ पर्यंत जल संकट संपण्याचे उद्दिष्ट दिले होते.ते आता वाढवून २०२८ पर्यंत करण्यात आले असे संघटनेचे फिरोज अन्सारी यांनी सांगितले.२०२१ मध्ये ४० हजार पाणी पुरवठा योजना सुरू करण्यात आल्या होत्या. त्यापैकी ६६% योजनांना कामाचे आदेशच मिळाले नाही.असेही त्यांनी या अभियानाची माहिती देताना स्पष्ट केले.संपूर्ण राज्यात विविध पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाणीपुरवठा केल्या जातो परंतु ते नियमित व शुद्ध न होता, कुठे २ दिवस कुठे ४ दिवसा आड तर कुठे ७ ते १५ दिवसाने पाणी पुरवठा करण्यात येतो.नागरिकांना पाण्याबाबत आपल्या अधिकाराची जाण होत नसून, कलम २१ नुसार त्यांना हे अधिकार मिळाले पाहिजेत,या साठी संघटने तर्फे सदर 'पाणी हक्क' अधिकार अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानात पाण्याबाबत नागरिकात जागरूकता निर्माण करणे, लोकांना राज्य जल धोरणातील तरतुदींबद्दल माहिती देणे, पाण्याच्या गरजांचे सर्वेक्षण करणे, मागणी- पुरवठ्या तील तफावत समजून घेणे, सरकारसोबत संवाद आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करणे,राज्य स्तरावर माहिती-आधारित पुरावे तयार करणे, समुदाय आणि प्रशासन यांच्यातील संवाद मजबूत करणे,पाण्याच्या शाश्वत वापरास प्रोत्साहन देणे हा अभियानाचा उदात्त उद्देश आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **MOHAMMED ISHAQUE** which now I am, changing as (new name) **MOHAMMED ISHAQUE AHMED MOHAMMED NIZAMUDDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMMED ISHAQUE AHMED MOHAMMED NIZAMUDDIN**
R/o 45-2, Pandri galli, post Karkheli
Tq.Dharmabad Dist. Nanded-431808
M.No.-8055737686

CHANGE IN NAME

My (old name) is **MD SHOYAB MD MUSTAK SHARIF** which now I am, changing as (new name) **SHOYAB MUSTAK SHARIF**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SHOYAB MUSTAK SHARIF**
R/o Ashok nagar Bhokar Nanded-431801
M.No.-9156964786

CHANGE IN NAME

My (old name) is **MD MUSTAK SHARIF** which now I am, changing as (new name) **MUSTAK YUNUS SHARIF**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MUSTAK YUNUS SHARIF**
R/o Ashok nagar Bhokar Nanded-431801
M.No.-9422872786

CHANGE IN NAME

My (old name) is **SAKINA BANO** which now I am, changing as (new name) **SAKINABANO MUSTAK SHARIF**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SAKINABANO MUSTAK SHARIF**
R/o Ashok nagar Bhokar Nanded-431801
M.No.-9403308222

CHANGE IN NAME

I declare that my minor daugster (old name) is **TOPLY SAMYRA FATEMA** which Now I am, Changing as my minor daugster (new name) **SAMAYRA FATIMA MOHAMMAD ASIF TOPLY**

Hence, forth my daugster all correspondance will be done as per my minor daugster new name. Please consider the same.

Sign by
**SAKINA BANO TOPLY**
R/o Ashok nagar Bhokar Nanded-431801
M.No.-9403308222

CHANGE IN NAME

My (old name) is **MAHAMMED ESAKHAHAMAD M NIJAMODDIN** which now I am, changing as (new name) **MOHAMMED ISHAQUE AHMED MOHAMMED NIZAMUDDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMMED ISHAQUE AHMED MOHAMMED NIZAMUDDIN**
R/o 45-2, Pandri galli, post Karkheli
Tq.Dharmabad Dist. Nanded-431808
M.No.-8055737686

CHANGE IN NAME

My (old name) is **M. NIJAMODDIN** which now I am, changing as (new name) **MOHAMMED NIZAMUDDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMMED NIZAMUDDIN**
R/o 45-2, Pandri galli, post Karkheli
Tq.Dharmabad Dist. Nanded-431808
M.No.-9665599880

# ९३ टक्क्यांसह मैत्री पाडमुखचे दैदिप्यमान यश

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील विश्वनाथअप्पा हुरणे ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थिनी मैत्री रितेश पाडमुख हिने बारावीच्या परीक्षेत ९३ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे कुटुंबियांसह शाळा व मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मैत्री पाडमुख हिने इंग्रजी विषयात ८६, इकॉनॉमिक्समध्ये ९५, बुककिपिंग अँड अकाउंटन्सीमध्ये ९१, सीक्रेटरियल प्रॅक्टिसमध्ये ९८, मॅथ्स अँड स्टॅटिस्टिक्स (कॉमर्स) मध्ये ९६ आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (कॉमर्स) मध्ये ९२ गुण मिळवत एकूण ६०० पैकी ५५८ गुण प्राप्त केले आहेत. सातत्यपूर्ण अभ्यास, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर तिने हे यश मिळवले आहे. मैत्रीच्या या यशाबद्दल तिचे पालक अ‍ॅड. रितेश पाडमुख, अ‍ॅड. शालन रितेश पाडमुख तसेच चिंतामण आनंदराव पाडमुख, शशिकला चिंतामण पाडमुख, राजेश पाडमुख आणि गुरुजनांनी तिचे कौतुक केले आहे. मित्रपरिवाराकडूनही तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मालेगाव येथे सराफा व्यापाऱ्याची बॅग पळविली

नांदेड/प्रतिनिधी-मालेगाव ता.अर्धापूर येथे शुक्रवारी सकाळी सराफा व्यापाऱ्याची दागिने असलेली बॅग अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे.

सराफा व्यापारी सचिन अशोकराव उड्डाणशिव रा. मालेगाव यांचे मालेगावातील मुख्य रस्त्यावर सराफा दुकान आहे. शुक्रवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास सचिन उड्डाणशिव यांचे वडील दुकानाचे शटर उघडून दुकानात बसले असतांना अज्ञात चोरट्यांनी उड्डाणशिव यांची नजर चुकवून दुकानातील साडेचार लाख रुपये किंमतीची सोन्याचे दागिने असलेली बॅग काही क्षणातच लंपास केली. या प्रकरणी सचिन उड्डाणशिव यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अर्धापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी अर्धापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक चंद्रशेखर कदम यांनी भेट देवून पाहणी केली. परीसरातील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक बाबी तपासून आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

# पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करु : पालकमंत्री अतुल सावे

नांदेड/प्रतिनिधी-राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्रकार संरक्षण कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी निश्चित पाठपुरावा करू अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आज पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या शिष्टमंडळास दिली.

अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त,पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांच्या शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांची नियोजन भवन नांदेड येथे भेट घेतली. यावेळी खा. अशोकराव चव्हाण, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांचीही उपस्थिती होती.राज्यात पत्रकारांवर होणाऱ्या हल्लूयांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.त्यामुळे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ ओळखल्या जाणाऱ्या माध्यम क्षेत्रात चिंतेचे वातावरण आहे.निर्भीडपणे पत्रकारिता करण्यासाठी पत्रकारांवर अप्रत्यक्ष दबाव येत आहे.ही परिस्थिती लक्षात घेता लोकशाहीला अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्रात सर्वप्रथम २०१७ मध्ये हा कायदा बनविण्यात आला.त्यानंतर नोव्हेंबर २०१९ मध्ये या कायद्याच्या मसुद्यावर महामहीम राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केली असली तरीही महाराष्ट्र सरकारने आजपर्यंत हा कायदा प्रभावीपणे अमलात आणलेला नाही. त्यामुळे पत्रकार संरक्षण कायद्याची तातडीने कठोर अंमलबजावणी करावी. पत्रकार संरक्षण कायद्याची शासन अधिसूचना तातडीने जारी करावी. यासाठी आपण आपल्या स्तरावरून राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्याकडे पाठपुरावा करावा.पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र या देशातील पहिले राज्य व्हावे




यासाठी आपण पाठपुरावा करावा अशी मागणी आज पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनावर परिषदेचे उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, पत्रकार अधिस्वीकृती समितीचे विभागीय अध्यक्ष विजय जोशी, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक प्रदीप नागपूरकर, जिल्हा समन्वयक राम तरटे, गजानन कानडे, लक्ष्मण भवरे, अनुराग पोवळे, अंकुश सोनसळे, योगेश लाटकर, प्रवीण खंदारे, महेंद्र देमगुंडे, राजू कोटलवार, कंथक सूर्यतळ, प्रशांत गवळे, संघरत्न पवार, जयवर्धन भोसीकर, कुवरचंद मडले, अभिषेक एकबोटे, नकुल जैन, मोहम्मद रफीख, राहुल सरपाते, पुरुषोत्तम जोशी आदी पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भोकर तालुक्यातील ४ मंडळांना २७६ कोटीचा पिक विमा मंजूर

## किनी मंडळाला पिक विमा मंजूर न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप

भोकर/प्रतिनिधी-मागील वर्षाच्या खरीप हंगामात पिकांचे अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने पिक विमा मंजूर झाला असून तालुक्यातील ४ मंडळांना २७६ कोटी ५१ लाख ६७६७ रुपये शेतकऱ्यांना विमा मिळणार आहे. तालुक्यातील किनी मंडळाला मात्र विमा मिळाला नसल्याने शेतकरी वर्गामधून संताप व्यक्त केल्या जात आहे.

मागील वर्षीच्या खरीप हंगामात २०२५-२६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. पिके जलमय झाली होती. पंतप्रधान पिक विमा योजनेतून कृषी विमा कंपनीने सोयाबीन पिकाचा विमा मंजूर केला असून भोकर तालुक्यातील ५ मंडळापैकी ४ मंडळांना २७६ कोटी ५१ लाख ७६७६ रू. पिक विमा मंजूर झाला भोकर मंडळातील ४८६४ शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १४,२८० रुपये प्रमाणे ५४ कोटी ३२ लाख ८३४६ रुपये मंजूर झाले. भोशी मंडळातील ४५८९ शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १५५५९ रुपये प्रमाणे ५१ कोटी ९१ लक्ष ७५३३ रुपये विमा मंजूर झाला. मातुळ मंडळातील ५९२९ शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी १५९४१ रुपये प्रमाणे ८५ कोटी ९३ लक्ष ९८५९ रुपये मंजूर झाले. मोघाळी मंडळांमधील ६८०० शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १४ ५४० प्रमाणे ८४ कोटी ३३ लक्ष १९३५ रुपये मंजूर झाले. भोकर तालुक्यातील किनी मंडळात देखील अतिवृष्टी झाली सोयाबीन कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.मात्र किनी मंडळाला सोयाबीन पिकाचा पिक विमा मंजूर झाला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून शेतकरी वर्ग आंदोलन करण्याच्या तयारी मध्ये आहेत.पिक विमा कँमनीने दुजाभाव करून किनी मंडळाला वगळल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. किनी मंडळाला देखील पिक विमा मंजूर करून द्यावा अशी मागणी होत आहे.

# रॉयल्टीचा मुखवटा, मातीची उघडी लूट; नायगावात प्रशासनच संशयाच्या भोवऱ्यात

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील धनज परिसरात मातीमाफियांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून नाममात्र रॉयल्टीच्या आडून हजारो ब्रास मातीचे बेकायदेशीर उत्खनन सुरू असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. शासनाच्या डोळ्यांत धूळफेक करत दिवसाढवळ्या आणि रात्रीच्या अंधारातही मातीची मोठ्या प्रमाणावर लूट सुरू असल्याने महसूल विभागाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

या अवैध उत्खननामुळे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत असताना पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे, सुपीक शेतजमिनींची होत असलेली नासधूस शेतकऱ्यांसाठी विनाशकारी ठरत असून त्यांच्या आर्थिक कँबरड्याला जबर फटका बसत आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संतापाचा ज्वालामुखी धगधगत आहे. दरम्यान, धनज येथील तलाठी कदम पी.एस. यांच्या कार्यपद्धतीवरही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. महसूल विभागातीलच काही कर्मचारी मातीमाफियांना मूक संमती देत असल्याचा आरोप होत असून कुंपणच शेत खात आहे अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहे. प्रशासनाच्या या ढिसाळ आणि संशयास्पद भूमिकेमुळे संपूर्ण यंत्रणेची विश्वासार्हता धोक्यात आली आहे.या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून मातीमाफिया तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. महसूल विभागाने तातडीने हस्तक्षेप करून या बेकायदेशीर उत्खननाला आळा घालावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# रामतीर्थ येथे ५ मे रोजी तथागत गौतम बुद्ध मूर्ती स्थापन सोहळा

किनाळा/प्रतिनिधी-रामतीर्थ येथे बांधण्यात आलेल्या तक्षशिला बुद्ध विहारात ५ मे रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची स्थापना सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन खा.रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते संपन्न होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते व माजी खा.भास्करराव पाटील खतगावकर हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून आ.जितेश अंतापूरकर यांची उपस्थिती राहणार आहे. डॉ.अनिरुद्ध वनकर व त्यांचा संच प्रस्तुत शिवराय ते भिमरायांचा वादळ वारा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात ५ मे रोजी सकाळी आठ वाजता प्रा.डॉ. किशन गायकवाड यांच्या हस्ते तक्षशिला बुद्ध विहाराजवळील पंचशील ध्वजारोहण करून मेजर जनरल सुरेश गजभारे, लेफ्टन कर्नल आनंद झगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत समता सैनिक दलाकडून पंचशील झेंड्यास मानवंदना दिली जाणार आहे. यानंतर दुसऱ्या सत्रात सकाळी नऊ वाजता तक्षशिला बुद्ध विहारात बसवण्यासाठी आणण्यात येणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या भव्यमूर्तीची धुप्पा पाटीपासून शंकरनगर बसस्थानक ते तक्षशिला बुद्ध विहारापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात सकाळी साडेदहा वाजता तक्षशिला बुद्ध विहारात जगाला शांतीचा संदेश देणारे महाकारूणीक तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची स्थापना करून या प्रसंगी भदंत पयाबोधी थेरो यांची धम्मदेशना होणार आहे. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून देगलूर बिलोली विधानसभेचे आ.जितेश अंतापुरकर, माजी आ. सुभाष साबने, डॉ .मीनल पाटील खतगावकर, धोंडीबा कांबळे, दशरथ लोहबंदे, माणिकराव लोहगावे, रवी पाटील खतगावकर, सपोनी विक्रम हराळे, राहुल प्रधान, विवेक केरूरकर, भगवान धबडगे, गणेश सोंडारे, हौसाजी वारघडे, गंगाधर सोंडारे आधी सह अन्य मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# धर्माबादमध्ये विजेचा खेळखंडोबा; सर्वसामान्य नागरिक वैतागले

धर्माबाद/प्रतिनिधी-उन्हाळ्याच्या तीव्र उकाड्यात धर्माबाद शहरातील नागरिकांना विजेच्या अनियमित व वारंवार खंडित होणाऱ्या पुरवठ्यामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. तापमान ४० ते ४२ अंशांच्या पुढे गेलेले असताना वीज वेळेवर उपलब्ध होत नसल्याने सर्वसामान्यांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

शहरासह वाडी-वस्त्यांवर सिंगल फेज वीजपुरवठाही नियमित नसल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना उकाड्याचा तीव्र सामना करावा लागत आहे. डिपींवर वाढलेला भार, वेळेत न होणारे दुरुस्ती व बदल यामुळे कमी दाबाने वीजपुरवठा होत असून परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. दररोज २४ तासांत तब्बल १५ ते २० वेळा वीज खंडित होत असल्याने नागरिकांचा संताप वाढत आहे. एकदा वीज गेल्यानंतर तासन्तास परत येत नसल्याने उकाड्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे बाजारपेठेतील व्यापारी, छोटे उद्योगधंदे, तसेच घरगुती पातळीवर एसी, कुलर आणि पंख्यांवर अवलंबून असलेले नागरिक हवालदिल झाले आहेत. उष्णतेपासून दिलासा मिळावा म्हणून वापरल्या जाणाऱ्या विद्युत उपकरणांचाच उपयोग होत नसल्याने नागरिकांचा त्रास अधिकच वाढला आहे.महावितरण कंपनीच्या ढिसाळ कारभारामुळे शहरवासीयांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच धर्माबादकरांनी निवडून दिलेल्या आमदार व खासदारांनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील पहिले सह दिवाणी न्यायाधिश कनिस्ट स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री.आर.पी.शिंदे)
किरकोळ दिवाणी अर्ज (आर.जे.ई.) क्र.५९१/२०२६

अर्जदार : १. मुन्नीकौर भ्र.सुरजितसिंघ टाक वय : ५० वर्ष, धंदा : घरकाम, २.गोपालसिंघ पि.सुरजितसिंघ टाक वय : ३१ वर्ष, धंदा-शिक्षण, ३. हारविरप्रतापसिंघ पि.सुरजितसिंघ टाक वय : २० वर्ष, धंदा-शिक्षण, अर्जदार क्र.१ ते ३ रा.एन.डी.४१ के.२ राहुल नगर, सिडको नवीन ता.जि.नांदेड मो.नं.७४२००५४१३१ ई-मेल-नाही, ४. सीमरनकौर भ्र.कुलजितसिंघ जुन्नी वय : ३० वर्ष, धंदा-घरकाम रा.नवीन कौठा, ता.जि.नांदेड, ५. काजलकौर भ्र.कुलदीप टाक वय : २६ वर्ष, धंदा-घरकाम रा.शास्त्रीनगर, ता.कळमनुरी जि.हिंगोली, ६. परमजीत कौर भ्र.भगतसिंग बावरी वय : २५ वर्ष, धंदा-घरकाम रा.उदगीर ता.उदगीर जि.लातूर

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ आणि ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. अर्जदार क्र.१. मुन्नीकौर भ्र.सुरजितसिंघ टाक वय ५० वर्ष, धंदा-घरकाम, २.गोपालसिंघ पि.सुरजितसिंघ टाक वय ३१ वर्ष, व्यवसाय-शिक्षण, ३.हारविरप्रतापसिंघ पि.सुरजितसिंघ टाक वय २० वर्ष, व्यवसाय-शिक्षण अर्जदार क्र.१ ते ३ रा.एन.डी.४१ के.२ राहुल नगर, सिडको नवीन ता.जि.नांदेड, ४. सीमरनकौर भ्र. कुलजितसिंघ जुन्नी वय : ३० वर्ष, धंदा - घरकाम, ५. काजलकौर भ्र. कुलदीप टाक वय : २६ वर्ष, धंदा-घरकाम रा.शास्त्रीनगर, ता.कळमनुरी जि.हिंगोली, ६. परमजीत कौर भ्र.भगतसिंग बावरी वय : २५ वर्ष, धंदा-घरकाम रा.उदगीर ता.उदगीर जि.लातूर यांनी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात नमूद केले आहे की, मयत ज्ञानेश्वर पि.जगन्नाथ भालेराव यांचा मृत्यू दिनांक १५.०३.२०२३ रोजी झाला आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे. अर्जदाराने मान्यवर न्यायालयात अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक २०/०६/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आक्षेप नोंदवावा मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०२ माहे मे २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

"आदेशावरुन"

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
८ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,
नांदेड

# सायन्स महाविद्यालयाचे घवघवीत यश

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील विविध कनिष्ठ महाविद्यालयांच्या बारावी (इयत्ता १२) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून अनेक महाविद्यालयांनी समाधानकारक कामगिरी केली आहे. विशेषतः विज्ञान शाखेत यशवंत महाविद्यालया पाठोपाठ नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेजचा निकाल ९० टक्के लागला असून ३८० पैकी ३४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या महाविद्यालयानेही चांगली कामगिरी बजावली आहे.

यंदाच्या बारावी परीक्षेच्या निकालात शहरातील विज्ञान शाखेत यशवंत महाविद्यालयाचा निकाल सर्वाधिक तर त्या पाठोपाठ नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सायन्स कॉलेजने निकालात बाजी मारली आहे. प्रतिभा निकेतन महाविद्यालयात विज्ञान शाखेचा निकाल ८९.२८ टक्के, वाणिज्य शाखेचा ८८.८८ टक्के तर कला शाखेचा निकाल मात्र केवळ ४७.०५ टक्के लागला आहे. एकूण निकाल ७९.१६ टक्के राहिला आहे. पीपल्स कॉलेज, नांदेड येथे कला शाखेचा निकाल ६४.०४ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ६९.०९ टक्के लागला आहे. एकूण निकाल ६५.९७ टक्के नोंदविण्यात आला आहे. या निकालांवरून विज्ञान शाखेत विद्यार्थ्यांची कामगिरी अधिक चांगली असल्याचे दिसून येत आहे. काही महाविद्यालयांमध्ये कला शाखेचा निकाल तुलनेने कमी लागल्याचेही स्पष्ट झाले आहे. एकूणच नांदेड जिल्ह्यातील निकाल समाधानकारक असला तरी काही शाखांमध्ये सुधारणा आवश्यक असल्याचे चित्र समोर आले आहे.

# पंचशील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम

## विज्ञान शाखेचा ९१ तर कला शाखेचा ८३ टक्के निकाल

हदगाव/प्रतिनिधी-शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता बारावीच्या ऑनलाईन निकालात विज्ञान शाखेचा निकाल ९१ टक्के तर कला शाखेचा निकाल ८३% लागला असून शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

विज्ञान शाखेतून कु.आरती दत्ता शिंदे ८६.३३ तर कु.पूजा शिवाजी वाघमारे ७४.६७ कु. प्रज्ञा सत्यप्रकाश कुंभकर्ण ७२.६७, शुभम शंकर राठोड ७१.३३ गुण प्राप्त करून अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. तर कला शाखेतून गंगाराम दिगंबर झाडे ८०.१७, कु.पल्लवी रावसाहेब वानखेडे ७८.३३, कु.प्रज्ञा प्रदीप पाईकराव ७७.८३, अभय गौतम काळबांडे ७६.१७ तर कु.दिपाली बालाजी गायकवाड ७५.८३ टक्के गुण प्राप्त करून अनुक्रमे प्रथम, दुतीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले सह सर्व संचालक मंडळ तसेच प्राचार्य अनिल दस्तूरकर सह उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राध्यापकांनी अभिनंदन केले आहे.

पान १ वरुन

### बारावी निकालात मुली...

सुमारे १०० कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी सुमारे २ हजार टन कागदाचा वापर करण्यात आल्याची माहितीही मंडळाने दिली. एकूणच, राज्यात निकालात किंचित घट झाली असली तरी मुलींचे वर्चस्व कायम राहिले आहे. कोकण विभागाने पुन्हा एकदा अव्वल स्थान मिळवत आपली परंपरा जपली आहे, तर नांदेडमध्ये विज्ञान शाखेने चमक दाखवत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची झलक दाखवली आहे.

### हवामान विभागाच्या...

आणि विदर्भात परिस्थिती अधिक गंभीर असून, तापमान ३७ ते ४२ अंशांच्या दरम्यान आहे. काही ठिकाणी हिट वेव्हसारखी परिस्थिती कायम राहणार आहे. हवामान विभागाने नैऋत्य मान्सून अंदमान-निकोबार बेटांवर १४ ते १६ मे दरम्यान दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यानंतर २० मेपर्यंत मान्सून अधिक सक्रिय होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे पुढील काही आठवड्यांत देशभरातील हवामानात हळूहळू बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत.

### मटका अड्डयांवर...

अनवर अलीखान अकबर अलीखान रा.खडकपूरा,नांदेड, कमल यादव रा. वजीराबाद नांदेड, वेणु कांबळे, रोहन कांबळे रा.कल्याणनगर, नांदेड, केशव लक्ष्मण चिद्रावार, रा.लाईनगल्ली देगलूर, शैलेष सुभाषराव पांडलवार रा.भोईगल्ली, देगलूर, सुभाष थडके, बालाजी थडके रा.देगाव ता.देगलूर, संतोष नईनवाड रा.शिवनेरीनगर, देगलूर यांच्या विरुध्द भाग्यनगर व देगलूर पोलीस ठाण्यात स्वतंत्ररित्या गुन्हे दाखल करण्यात आले.

### जिल्ह्यातील सेतू महाऑनलाईन...

झाले तर ६ दिवस सेतू सुविधा केंद्र बंद राहू शकतात. त्यामुळे नागरिकांची कामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित राहतील विद्यार्थ्यांना सुद्धा अडचणी निर्माण होतील. शेतकऱ्यांची कामे खोळंबलेली असतील. शासनाने सदरील सेतू सुविधा केंद्र चालकांना त्वरित सुविधा चालू करण्याबाबत आदेश देऊन विद्यार्थी व नागरिकांचे गैरसोय दूर करावी अशी मागणी होत आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४